# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गणेशखिंड ते कापरे दरम्यान रस्त्याची दुरावस्था झाल्याबाबत**

**(१) १२४४९ (१०-०४-२०१५). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गणेशखिंड ते कापरे दरम्यान रस्त्याची अत्यंत दुरावस्था झालेली असून वाहतुकीची गैरसोय होत असून सदर रस्त्याच्या सुधारणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची सुधारणा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :** (१) होय.

(२) मार्च २०१५ चे अर्थसंकल्पामध्ये सदर रस्त्यावरील कि.मी. ०/०० ते २/०० व कि.मी. ५/०० ते ५/७०० मध्ये सुधारणा व डांबरीकरण करणेचे काम मंजूर आहे.

सदर रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे खडीने भरणेचे काम प्रगतीत असून सदय स्थितीत वाहतूक सुरळीत सुरु ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हापरिषदेचे तत्कालीन उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याविरुध्द मानव विकास कार्यक्रमांतर्गत प्रयोगशाळा साहित्य खरेदीमध्ये केलेल्या अनियमिततेबाबत**

**(२) १२४७२ (०९-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हापरिषदेचे तत्कालीन उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याविरुध्द प्रभारी शिक्षणाधिकारी, जि.प.ठाणे (माध्यमिक) या पदावर कार्यरत असतांना मानव विकास कार्यक्रमांतर्गत प्रयोगशाळा साहित्य खरेदीमध्ये केलेल्या अनियमिततेमुळे त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २७ जून, २०१३ रोजी दिलेल्या पत्र क्र.विचौअ-२०१३/(प्र.क्र.७३)/प्र.शा.३ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने संबंधितावर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :** (१) या प्रकरणी संबंधित उपशिक्षणाधिकारी (माध्य.) व तत्कालीन प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य.) ठाणे यांच्याविरुध्द शासनामार्फत क्र.विचौअ-२०१३/प्र.क्र.७३/प्रशा-३, अन्वये दोषारोपाचे ज्ञापन बजाविण्यात आले होते.

(२) उक्त कारवाईअंती शासन ज्ञापन क्र.विओच-२०१३ (प्र.क्र.७३/१३)/प्रशा-३, दिनांक १५.९.२०१४ अन्वये त्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्यासाठी कोळशावर आधारीत वीजप्रकल्प शहरातील सांडपाण्यावर चालविण्याबाबत**

**(३) १२४९० (३०-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळामुळे औष्णिक ऊर्जाप्रकल्प बंद ठेवण्यात आले आहेत या प्रकल्पांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्यासाठी कोळशावर आधारीत वीजप्रकल्प शहरातील सांडपाण्यावर चालविण्याचा कल्पना मा.ऊर्जा मंत्री महोद्यांनी मांडल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार या प्रकल्पाबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) विजनिर्मिती केंद्राजवळ असलेल्या शहरातील उपलबध संडपाण्यावर पक्रिया करुन ते पाणी योग्य निकषापर्यंत शुध्द करुन वीज निर्मिती केंद्रातील कुलींग वॉटर सिस्टिम करीता वापरण्याची योजना आहे. महानिर्मिती कंपनीमार्फत या योजनेची वीजनिर्मिती केंद्रनिहाय तांत्रिक व वाणिज्यीक व्यवहार्यता तपासण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बिबट्यांच्या अपघाती मृत्युचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत**

**(४) १२४९३ (०८-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बिबट्यांच्या अपघाती मृत्युचे प्रमाण दिवसे दिवस वाढत असल्यामुळे बिबट्यांची संख्या दिवसे दिवस घटत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवसे दिवस बिबट्यांचा होत असलेला अपघातकी मृत्यूला आळा घालण्याबाबत तसेच बिबट्याच्या होत असलेला अपघातकी मृत्यूकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाकडे कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बिबट्यांचे अपघाती मृत्यू होऊ नयेत म्हणून वनांच्या सीमेलगतच्या विहीरींना कठडे करणे, रस्त्यांवर गतीरोधक व वेग मर्यादेचे पालन करण्याच्या सूचना फलक लावण्यात आले आहेत. वन्यप्राण्यांना वनातच पाणी उपलब्ध व्हावे हयासाठी वन क्षेत्रात जलसंधारणाची कामे घेतली जातात.
बिबट्यांच्या अपघाती मृत्यूकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

---

**मराठवाड्याहून नेहमीच पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे मराठवाडा विद्यापीठातील भुशास्त्रतज्ञ व बीसीयुडी संचालक यांनी जलसंवधनाच्या कामाकडे लक्ष देण्याबाबत सूचित केल्याबाबत**

**(५) १२५०५ (०८-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्याहून नेहमीच पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे तसेच पाण्याच्या उपसा दिवसेदिवस वाढत असल्यामुळे जलसंवर्धनाच्या कामाकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे मराठवाडा विद्यापीठातील भुशास्त्रतज्ञ व बीसीयुडी संचालक यांनी सूचित केल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्याचे वाळवंट होऊ नये यासाठी जलसंवर्धाच्या कामाकडे विशेष लक्ष देण्याबाबत शासनाने कोणती खास उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील बीसीयुडी संचालक (बोर्ड आॅफ कॉलेज ॲण्ड युनिवर्सिटी डेव्हलपमेंट) अंतर्गत राष्टीय सेवा योजनेच्या (एनएनएस) समन्वयक (कोऑडिनेटर) यांनी विद्यापीठांतर्गत असणा-या सर्व महाविद्यालयांना जलसंवर्धनाबाबत शिबीर आयोजन करण्याबाबत पत्राने कळविले आहे.

(२) विद्यापीठतंर्गत असणा-या २२० महाविद्यालयामध्ये जलसंवर्धनाबाबत शिबीर आयोजन करण्यात येत आहे.

सन १९९२-९३ ते मार्च २०१३-१४ या कालावधीत मराठवाड्यातील ३२.५८ लाख हेक्टर उपवारीत करण्यात आले आहे. सन २००५-०६ पासून मराठवाडा विकास कार्यक्रमातंर्गत मराठवाडा पाणलोट विकास मिशन राबविण्यात आले होते. मराठवाडा विभागात केंद्र व राज्य योजनाद्वारे माती नालाबांध सिमेंट नाला बांध, शेततळे, वळण बंधारे इत्यादी उपचार करण्यात आले असून त्या द्वारे १.९३ लाख हेक्टर अप्रत्यक्षरित्या सिंचनाखाली आले आहे.

तसेच जलयुक्त शिवार अभियानातंर्गत मराठवाड्यातील १६८२ गावे निवडण्यात आली असून सन २०१५-१६ करिता जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत रु.२८० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मका खरेदी केंद्र सुरु करणेबाबत**

**(६) १२५०८ (०९-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दरवर्षी साधारण नोव्हेंबरमध्येच परंतू अद्याप खरेदी सुरू झालेली नसल्याने शेतकरी मिळेल त्याभावाने आपला थोडाफार झालेला मका मिळेल त्या भावाने व्यापा-यांना विकत आहे ही लुट थांबविण्यासाठी शासकीय मका खरेदी केंद्र सुरू करून शेतक-यांच्या पदरात जास्तीचे पैसे टाकण्यासाठी शासनाने मदत करावी अशी मागणी शेतक-यांकडून होत असल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मका खरेदी केंद्र सुरू करून शेतक-यांना दिलासा देण्यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. आधारभूत किंमतीचा लाभ होण्याच्या दृष्टीने व शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये म्हणून राज्य शासनातर्फे धान/भरडधान्य (एफ.ए.क्यू) खरेदी करण्यात येते.

त्यानुसार, राज्य शासनाने दि.३०.१०.२०१४ रोजी आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान/भरडधान्य खरेदी करण्याबाबतचा शासननिर्णय निर्गमित केला आहे.

तथापि, केंद्र शासनाने दि.१३.१०.२०१४ च्या पत्रान्वये दिलेल्या निदेशानुसार राज्यात मक्याची खरेदी दि.१ जानेवारी, २०१५ रोजीपासून सुरु करावयाची आहे.

त्यानुसार दोन्ही अभिकर्ता संस्था तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना शासनाच्या दि.२.१.२०१५ च्या पत्रान्वये आवश्यक सूचना पुनःश्च देण्यात आल्या आहेत.

दि.३१.३.२०१५ अखेर राज्यात सुरु झालेली खरेदी केंद्रे व झालेली भरडधान्य खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

| खरेदी केंद्र | खरेदी (क्विंटल) | | |
|---|---|---|---|
| | ज्वारी | बाजरी | मका |
| २४९ | ५६१३३.३० | ०.०० | ८८७४० |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अजिंठा (ता, जि.औरंगाबाद) येथील गावात नवीन पाईप लाईनचे काम सुरु असल्याने नागरिकांची होणारी गैरसोय**

**(७) १२५१५ (०७-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा (जि.औरंगाबाद) गावात नवीन पाईपलाईनचे काम सुरु आहे त्यामुळे जागोजागी पाईपलाईन फुटत आहे, जुनी निजामकालीन पाईपलाईन व वॉल जागोजागी लिकेज असून नळाला पाणी आले की, शिवना गेट जवळून लिकेज पाणी, सांडपाणी, गटारीतून वाहणारे पाणी यामुळे गांधी चौकात जागोजागी पाणी साचते तसेच गांधी चौकात आठवडा बाजार रविवारी भरत असून बाजारात सर्वत्र दुर्गंधीयुक्त घाण पाण्यात सर्व भाजीपाला भिजला जात असल्याने तो वांरवार धुवून व्यापारांना विकावा लागतो व अशा परिस्थितीत नागरिकांना बाजार करावा लागतो यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी व्यापारी व नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०४-२०१५) :** (१) होय,

(२) अजिंठा गावातील अरुंद गल्ली बोळीत नवीन वितरण व्यवस्थेचे काम सुरु असून त्यामुळे जुन्या अस्तित्वातील वितरण व्यवस्था काही ठिकाणी फुटत आहेत. ग्रामपंचायती मार्फत त्याची लगेच दुरुस्ती करण्यात येऊन पाणी पुरवठा कार्यान्वित करण्यात येत आहे. नवीन जलकुंभावरुन वितरण व्यवस्थेद्वारे गावास पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे. नवीन वितरण व्यवस्थेचे काम ९० % पुर्ण झाले असून उर्वरित काम एक महिन्यात पुर्ण करण्यात येत असल्याने हा प्रश्न कायम स्वरुपी मिटणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळशिरस (जि.सोलापूर) पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम चार वर्षे होवूनही अद्यापी अपूर्ण असल्याबाबत**

**(८) १२५२४ (०६-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) या तालुक्यासाठी पंचायत समितीसाठी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम चार वर्षे होवूनही अद्यापी बांधकाम पूर्ण करण्यात आले नसल्याने सदरहू इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(२) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०५-२०१५) :** (१) माळशिरस पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या मुख्य इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज यांच्या मार्फत पुर्ण करण्यात आले आहे.

इमारती लगत उद्यान, फरशी व विद्युतीकरणाच्या कामात किरकोळ सुधारणा आवश्यक असल्याने, सदरील इमारत ताब्यात घेण्यात आलेली नही. सदर सुधारणा पुर्ण झाल्यानंतर इमारत जिल्हा परिशदेकडे हस्तांतरीत करुन घेण्यात येणार आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तिवसा तालुक्यात (जि.अमरावती) आनंदवाडी परिसरात अप्पर वर्धा बांधेच्या कालव्यामध्ये भेगा पडल्याबाबत

**(९) १२५४२ (०८-०४-२०१५). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा तालुक्यात (जि.अमरावती) येथील आनंदवाडी परिसरात अप्पर वर्धा बांधेच्या कालव्यामध्ये भेगा पडल्या असल्याचे दि. १२.१२.२०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्यामधील पडलेल्या भेंगामुळे भविष्यात अपघात घडू शकतो, तो टाळण्यासंदर्भात या कालव्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सदर घटना ज्ञात होताच तात्काळ प्राथमिक उपाययोजना करण्यात आलेली आहे. तसेच कायमस्वरुपी दुरूस्तीकरीता विस्तृत उपाययोजना करण्यात येत आहेत.

---

## वरुड, (जि.अमरावती) येथील शेंदूरजनाघाट पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या आदिवासी बहुल गावात गावठी दारुची विक्री होत असल्याबाबत

**(१०) १२५५२ (०७-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) येथील शेंदूरजनाघाट पोलीस स्टेशन अंतर्गत येणा-या आदिवासी बहुल गावात गावठी दारु मोठया प्रमाणात तयार करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बहुतांश आदिवासी बहुल गावात युवा वर्ग दारुच्या आहारी गेल्याचे दिसून येत असुनही पोलीस विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे क
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) नाही.

शेंदूरजनाघाट हद्दीतल ग्राम करवार येथे बहुतांश आदिवासी नागरिक राहतात. सदर गावात गावठी हातभट्टीची दारु गाळत असल्याची खबर मिळालयामुळे पोलीसांनी छापा घातला असता हातभट्टी दारु व साहित्य असा एकूण रु. ३९,०५० चा माल जप्त करुन ४ आरोपींविरुध्द गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
(२) व (३) नाही.

चोरुन लपून दारुविक्री करणा-या व्यावसायिकांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. जानेवारी ते मार्च, २०१५ या कालावधीत गावठी दारु हातभट्टी प्रकरणी १९ प्रकरणे नोंदविण्यात आली असून गपवठी हातभट्टी दारु साहित्य व मोटार सायकल असा एकूण रु. ८२,०००/- चा माल जप्त करण्यात आलेला आहे व २१ आरोपींवरिुध्द मुंबई दारुबंदी करयद्यांअंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

वारंवार दारु विक्री करणा-या १७ व्यावसायिकांविरुध्द मुंबई दारुबंदी कायद्यांअंतर्गत कलम ९३ व २ व्यावसायिकांविरुध्द कलम ११० जा.फौ.प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनाथ बालकांना सांभाळणा-या सुमारे १० हजार सेवकांना अद्याप पगार मिळाला नसल्याबाबत**

**(११) १२५७३ (०८-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. डी.एस.अहिरे (साक्री), श्री. जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कायद्याच्या चौकटीत राहून निवासी स्वरुपाच्या अनाथ बालकांना सांभाळत २४ तास अविश्रांत काम करणा-या राज्यातील सुमारे १० हजार सेवकांना अद्याप पगार मिळाला नसल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर कर्मचा-यांना पगार देण्यासंदर्भत शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कारवाई करण्यात विलंब होत असल्यास होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या बालगृहात कर्मचाऱ्यांना शासनामार्फत मानधन / वेतन दिले जात नाही. शासनामार्फत स्वयंसेवी संस्थांना दिलेल्या सहाय्यक अनुदानातून कर्मचाऱ्यांचा खर्च भागविला जातो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे जिल्हयात स्वस्त धान्याचा पुरवठा करण्याबाबत**

**(१२) १२५७४ (०७-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयात सन २०१४-२०१५ दरम्यान शेकडो लोकांना नव्याने रेशनकार्ड बनवून देण्यात आले परंतू त्याप्रमाणात शिधावाटप दुकानदारांना देण्यात येणारा धान्याचा कोटा वाढविण्यात न आल्याने शिधापत्रिका असूनही सदर जिल्हयातील अनेक नागरिकांना स्वस्त धान्याचा पुरवठा होऊ शकत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हयातील शिधावाटप दुकानदारांना स्वस्त धान्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांना प्रतीमाह ५ किलो तर अंत्योदय अन्न योजनेतील सर्व लाभार्थ्यांना प्रती शिधापत्रिका प्रतीमाह ३५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात येते. त्यानुसार धुळे जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांना मंजुर नियतनानुसार विहित परिमाणात धान्य देण्यात येत आहे. परंतु या अधिनियमांतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल. (केशरी) शिधापत्रिकाधारकांना नोव्हेंबर, २०१४ पासून अन्नधान्याचा लाभ देता आला नाही.
(२) व (३) उपरोक्त लाभार्थ्यांना ऑक्टोबर, २०१४ नंतरच्या कालावधीत राज्य शासनाने आर्थिक भार सोसून अन्नधान्याचा लाभ द्यावा किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

---

**धुळे ग्रामीण भागातून धुळे शहरात येणा-या प्रवाशांचा मोठ्या प्रमाणावर ओघ असल्याबाबत**

**(१३) १२५७५ (०८-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे ग्रामीण भागातून धुळे शहरात येणा-या प्रवाशांचा मोठ्या प्रमाणावर ओघ आहे, परंतु सद्या धुळे ग्रामीण भागातून प्रवाशांना घेऊन धुळे शहरात येणा-या जवळपास २००० रिक्षांवर स्थानिक पोलीसांनी बंदी घातली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपसमारीची वेळ आलेल्या या रिक्षाचालकांच्या बाबतीत शासन काही उपाययोजना करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१५) :** (१) धुळे ग्रामीण भागातून धुळे शहरात येणा-या रिक्षांवर धुळे स्थानिक पोलीसांनी अथवा शहर वाहतूक शाखा, धुळे यांनी कोणत्याही प्रकारची बंदी घातलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुर्तिजापुर (जि.अकोला) उन्नेयी बंधा-यातुन तात्पुरती पाणी उचल परवानगी बाबत**

**(१४) १२५९२ (०६-०४-२०१५). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापुर औद्योगिक विकास केंद्रास काटेपूर्णा प्रकल्पाचे खालील बाजुस असलेल्या उन्नेयी बंधा-यातुन पाटबंधारे विभागाच्या, २८ आक्टोंबर, १९९७ च्या आदेशानुसार १० वर्षा पुरती तात्पुरती पाणी उचल परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) सदर तात्पुरत्या कालावधी दरम्यान म.औ.वि.केंद्राने सरळ काटेपूर्णा जलाशयातुन बंद पाईप लाईनने पाणी आणण्याबाबत अट घातली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, म.औ.वि.केंद्राने काटेपूर्णा जलाशयातुन बंद पाईप लाईनव्दारे पाणी उचल योजना कार्यान्वीत केली काय,

(४) नसल्यास, सदर प्रकरणी जबाबदारी असणाऱ्या प्रशासनावर काय कारवाई केली,

(५) नसल्यास, शासन निर्देशीत अटी-शर्ती नुसार शासन काय कार्यवाही करणार ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) औद्योगिक विकास केंद्र मुर्तीजापूर या संस्थेने कानशिवणी बंधा-यातून आजतागायत पाण्ययाची उचल केलेली नाही. तसेच काटेपूर्णा जलाशयातेन बंद पाईलप लाईन द्वारे पाणी उचल योजना कार्यान्वीत केली नाही.

(४) औद्योगिक विकास केंद्र मुर्तीजापूर या संस्थेने कानशिवणी बंधा-यातून आजतागायत पाण्याची उचल केलेली नसल्यामुळे काटेपूर्णा जलाशयातून बंद पाईप लाईन द्वारे पाणी उचलण्याची योजना कार्यान्वीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे या प्रकरणी कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) सदर योजना अद्यापपर्यंत कार्यान्वित नसल्यामुळे तसेच संबधीत संस्थेने अद्याप करारनामा न केल्यामुळे मंजूर पाणी आरक्षण रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील वन प्रकल्पाच्या नदीपात्रात असलेल्या डोहात सहलीसाठी आलेल्या तंत्रनिकेतनच्या दोन विद्यार्थ्यांचा डोहात बुडुन झालेला मृत्यु**

**(१५) १२५९३ (०६-०४-२०१५). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील वन प्रकल्पाच्या खालील बाजुस नदीपात्रात असलेल्या डोहात दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी सहलीसाठी आलेल्या तंत्रनिकेतनच्या दोन विद्यार्थ्यांचा डोहात बुडुन मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) सदर डोहात दरवर्षी असेच निरपराध लोकांना यापुर्वी सुध्दा बुडुन अपघाती मृत्यु होतात, हे खरे आहे काय,
(३) सदर अपघाताचे ठिकाणी कोणताही सावधानतेचा फलक वा संरक्षीत कठडा नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनीक अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय,
(५) असल्यास, सदर अपघाताचे ठिकाणी खबरदारीपर उपाय म्हणुन सावधान फलक व संरक्षीत कठडे उभारण्याची उपाय योजना करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) यापूर्वी सुध्दा सदर डोहामध्ये बुडून अपघाती झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या होत्या.
(३) सदर डोहाजवळ दर्शनीय ठिकाणी सावधानतेचा फलक लावलेला असून संरक्षीत कठडा उभारलेला नाही.
(४) सदर डोहाजवळ दर्शनीय ठिकाणी सावधानतेचा फलक लावलेला असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्बवत नाही.
(५) अपघात प्रवण स्थळ अकोला वनविभागाच्या परिसरात सावधानतेचा इशारा दर्शविणाऱ्या फलकाची वेगवेगळया ठिकाणी उभारणी करण्यात येत आहे.

---

**अकोला जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत उन्नेयी बंधा-यातील जलाशयातील पाणी बंद पाईप लाईनद्वारे आणण्याच्या मागणीबाबत**

**(१६) १२५९६ (०७-०४-२०१५). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत विविध पाणीपुरवठा योजनांसाठी काटेपूर्णा धरणातून पाणी सोडून प्रकल्पाचे खालील बाजुस असलेल्या उन्नेयी बंधा-यातुन पाणी उचल करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनांसाठी काटेपूर्णा प्रकल्पातुन उन्नेयी बंधा-या पर्यंत नदी पात्राद्वारे सोडण्यात येणारे पाणी मोठ्या प्रमाणात नाश पावत असल्याने पाणीनाश टाळण्यासाठी पाणी पुरवठा योजनांनी जलाशयातुन बंद पाईप लाईनद्वारे पाणी आणावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर पाणीनाश टाळण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीसाठी शासनास सादर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावांना मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

काटेपूर्णा प्रकल्प ते खांबोरा उन्नेयी बंधा-यापर्यंत पाईपलाईन टाकण्यासाठीच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव अद्याप मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोणवत ते नारंगी (ता.खालापूर, जि.रायगड) रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१७) १२५९९ (१०-०४-२०१५). श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणवत ते नारंगी (ता.खालापूर, जि.रायगड) रस्त्यांची अत्यंत नादुरुस्त झाले असून सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत यांच्याकडून केवळ दुरुस्ती करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :** (१) नाही.

प्रश्नांकित डोणवत ते नारंगी हा रस्ता डोणवत-मिरकुटवाडी या रस्त्याचा भाग सअनू सदर रस्त्याची लांबी २.०० कि.मी. इतकी आहे. सदर लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम नाबार्ड-१९ अंतर्गत पूर्ण करण्यात आले असून सदर लांबी वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग अमरावती यांच्या कार्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१८) १२६०८ (१०-०४-२०१५). डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग अमरावती यांच्या कार्यक्षेत्रात १२ जिल्ह्यांचा समावेश होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयातील गट “अ” ची ४ व गट “ब” ची ३८ पदे प्रदिर्घ काळापासून रिक्त आहेत ,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हि पदे रिक्त असल्याने अत्यंत संवेदनशील असलेल्या या विभागाच्या कामावर विपरित परिणाम होत असल्याने ही पदे तात्काळ भरावीत अशी मागणी सदर लोकप्रतिनीधी दि.५.१.२०१५ वा त्यासुमारास मा.मंत्री आदिवासी विकास विभाग यांचेकडे केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. विष्णु सवरा (०२-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत गट ''अ'' ची ७ व गट ''ब'' ची ३८ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदर रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोखंडवाला (कांदीवली) परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर जड वाहने अनधिकृतपणे उभी केली जात असल्याबाबत**

**(१९) १२६१२ (०७-०४-२०१५). श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोखंडवाला (कांदीवली) परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर जड वाहने अनधिकृतपणे उभी केली जात असल्यचे स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी दिल्या आहेत, हे खरे आह काय,

(२) त्यामुळे वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जड वाहनाचा आडोशामध्ये गदुल्ले तसेच समाज कंटकामार्फत विघातक गोष्टी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जड वाहनाच्या अनधिकृत पार्किगसंबंधात शासन ठोस कारवाई करणार आहे काय,
(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे काय,
(२) हे खरे नाही.

लोखंडवाला परिसर गेल्या ३-४ वर्षात विकसित झाल्याने येथे उच्चभ्रू व मध्यमवर्गीयांची वस्ती मोठया प्रमाणात वाढली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेकडून गटार दुरुस्तीचे कामे आणि रस्त्याचे कांक्रीटीकरण चालू आहे. तसेच, आकुर्ली रोडवरील महिंद्रा यलोगेट नाल्याजवळ आणि बिग बाझार सबवे येथे रस्ता अतिशय अरुंद असल्यामुळे वाहतूकीचा वेग मंदावता.

(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) महिंद्रा कंपनीच्या गाड्या रस्त्यावर अनधिकृतपणे उभ्या न करण्याबाबत कंपनीशी पत्रव्यवहार करण्यात आला असून अनधिकृतरित्या रस्त्यावर उभ्या राहणा-या ३९६ गाड्यांवर सन २०१५ मध्ये वाहतूक पोलीसंनी कारवाई केलेली आहे. तसेच, आकुर्ली रोडवरील संभाजीनगर चौकी ते लोखंडवाला सर्कल दरम्यान सकाळी ८.०० ते १२.०० व सायंकाळी ५.०० ते ९.०० या कालावधीत जड वाहनांना प्रवेशबंदी लागू केलेली आहे.

महिंद्रा कंपनीशी केलेल्या पत्रव्यवहारामुळे कंपनीत येणा-या जड-अवजड वाहनांचे लोडींग-अपलोंडीग आकुर्ली रोडवरील गेट ऐजवी ब्लू गेट व ठाकूर श्याम नारायण मार्गावरील ग्रीन गेट या पर्यायी रस्त्यावर वळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यामध्ये मानव विकास मिशनच्या स्थापनेबाबत**

**(२०) १२७०० (०८-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यामध्ये सन २००६ मध्ये मानव विकास मिशन ची स्थापना करण्यात आली होती, त्याचे दुसऱ्या टप्पा कार्यक्रमाला वर्ष २०११ मध्ये सुरूवात झाली परंतु त्या योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होत नसल्याचे जिल्ह्यातील मानव विकास मिशन योजनेच्या उद्देशालाच तडे जात असल्याची बाब दि. १.२.२०१५ रोजी वा त्यासुमारास समोर आली आहे, हेखरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या न होण्याची कारणे काय,

(३) असल्यास, या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्याविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०५-२०१५) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम शहर व परिसरामध्ये गांजा या अंमलीपदार्धाची विक्री होत असल्याबाबत.**

**(२१) १२७०८ (०७-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम शहर व परिसरामध्ये सर्रास गांजा या अंमलीपदार्धाची विक्री होत असल्याची बाब दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अंमलीपदार्थाची विक्री करण्या-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) वाशिम शहर व परिसरामध्ये गांजा या अंमली पदार्थाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आलेले नसून अंमली पदार्थ विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोडगव्हाण (ता.जि.वाशिम) येथे सुमारे चार महिन्यांपासून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक नसल्याबाबत**

**(२२) १२७१५ (०८-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोडगव्हाण, ता.जि.वाशिम येथे सुमारे चार महिन्यांपासून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत असल्याने या शाळेवर शिक्षक पाठविण्यासाडी जिल्हा परिषद प्रशासनाकडे ग्रामस्थांनी दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू जि.प.प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) अद्याप त्याबाबत कोणताही निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद शाळा जोडगव्हाण पंचायत समिती मालगाव येथे मंजूर ५ शिक्षकांच्या पदांपैकी एका शिक्षीकेची आंतरजिल्हा बदली झाल्यामुळे पद रिक्त झाले होते. तथापि सदरहू रिक्त पदी तात्पुरती व्यवस्था म्हणून एका सहाय्यक शिक्षकाची नियुक्ती केलेली असल्याने मंजूर पदसंख्येनुसार सर्व पदे भरलेली आहेत. यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान झालेले नाह.

---

**भुसावळ (जि.जळगांव ) शहरातील स्वस्त धान्य दुकानाला २६५५ बोगस रेशनकार्ड वाढविण्यात आल्यासंबंधी करावयाच्या चौकशीबाबत**

**(२३) १२७१६ (१०-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) शहरातील ९ स्वस्त धान्य दुकानाला माहे मार्च २०१४ व त्या सुमारास २६५५ बोगस रेशनकार्ड वाढविण्यात आल्या संबंधी तहसीलदार व पुरवठा तपासणी अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी दि.१७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव यांनी उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांना कळविले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर ठिकाणी एकाच महिन्यात सुमारे २६५५ बोगस शिधापत्रिका वाढविण्यात आल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उपायुक्त (पुरवठा) नाशिक व जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव यांना संपूर्ण चौकशी करून दोन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत तहसिलदार, भुसावळ यांनी केलेल्या चौकशीत २६५५ शिधापत्रिका या सन २०१० ते सन २०१३ या कालावधीत वितीरत करण्यात आल्या असून सदर शिधापत्रिका माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये भुसावळ तालुक्यातील ९ स्वस्त धान्य दुकानांना जोडण्यात आल्या आहेत.

याबाबत उपस्थित झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, भुसावळ यांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत १२०८ शिधापत्रिका या पुराव्याच्या कागदपत्रानुसार वैध असल्याच्या आढळून आल्या आहेत. तसेच, १४४७ शिधापत्रिकाधारक हे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांतील पत्त्यांवर वास्तव्यास असल्याचे आढळून न आल्याने सदर शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा व मनोरा (जि.वाशिम) येथील वन परिसरामध्ये डीएफओ व संबंधित आरएफओ यांच्या संगनमताने होणारी अवैध वृक्षतोड**

**(२४) १२७१८ (०८-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा व मनोरा (जि.वाशिम) येथे गेल्या १० महिन्यांत म्हणजे माहे एप्रिल, २०१४ ते माहे जानेवारी, २०१५ पर्यंत या भागाच्या व आजूबाजूच्या वन परिसरामध्ये डीएफओ व संबंधित आरएफओ यांच्या संगनमताने अवैध वृक्षतोडीचे विविध प्रकार उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरहू वृक्षतोड करणा-या व त्यास प्रोत्साहन देणा-या विरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०५-२०१५) :** (१) यवतमाळ वनवृत्तांतर्गत वाशिम जिल्हयातील कारंजा, मानोरा वनपरिक्षेत्रात माहे एप्रिल, २०१४ पर्यंत एकूण २१७ सागवृक्षांची तसेच १३१ सागेतर वृक्षांची अवैध तोड झाली आहे. सदरची तोड ही स्थानिक लोकांकडून व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदरहू वृक्षतोड डीएफओ च संबंधित आरएफओ यांच्या संगनमताने झालेली नाही.

(२), (३) व (४) वनसंरक्षणाचे अनुषंगाने नियमित नियतक्षेत्रांची तपासणी, नाकाबंदी, गस्ती करताना आढळलेल्या अवैध वृक्षतोडीच्या अनुषंगाने नियमानुसार वनगुन्हे नोंदवून प्रकरणांची चौकशी करण्यात येते.

---

**सावरगाव, धानोरा खुर्द, तळप बु. तसेच आदि गाव (ता.मानोरा, जि.वाशिम) येथे वन्य प्राण्यांनी पिकांची नासाडी केलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न देण्याची बाब**

**(२५) १२७१९ (०८-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव, धानोरा खुर्द, तळप बु. तसेच आदि गाव (ता.मानोरा, जि.वाशिम) येथे सन २०१३ - १४ मध्ये वन्य प्राण्यांनी पिकांची नासाडी केली असून याबाबत वन विभागाने १३ शेतक-यांच्या शेतीची पाहणी करून पंचनामे व सर्व्हेक्षण तयार करुन फक्त ३ शेतक-यांना नुकसान भरपाई दिली व १० शेतक-यांवर अन्याय झाल्याची बाब माहिती च्या अधिकारात दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १० शेतक-यांना अद्याप नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय,

(३) असल्यास, तातडीने या १० शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) व (२) श्री.अनिल देवराव चव्हाण, रा.मानोरा यांनी दिनांक २१.१०.२०१४ रोजी माहितीच्या अधिकारान्वये यवतमाळ वनवृत्तातील अकोला वनविभागामध्ये मानोरा तालुक्यात धानोरा खुर्द, सावरगांव, तळप बु. या गावातील सन २०१३-१४ मध्ये वन्यप्राण्यांनी केलेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी किती शेतक-यांना नुकसान भरपाई मंजूर केली आहे याबाबत माहिती वनक्षेत्रपाल कारंजा (प्रादेशिक) यांना विचारली असता १३ शेतक-यांची यादी उपलब्ध करुन देण्यात आली होती.

सदर यादीतील ३ शेतक-यांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार परिपूर्ण अर्ज केल्याने त्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली उर्वरित १० शेतक-यांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार परिपूर्ण अज्र केले नसल्याने त्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा व मंगरूळपीर (जि.वाशिम) पंचायत समिती**
**अंतर्गत अंगणवाडयांची रिक्त पद भरतीबाबत**

**(२६) १२७२३ (०८-०४-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा व मंगरूळपीर (जि.वाशिम) पंचायत समिती अंतर्गत अंगणवाडीतील रिक्त पद भरतीमध्ये प्राप्त अर्जांची छाननी बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी ५ दिवसांत करणे व त्यानंतर समितीने तीन दिवसांत गुणवत्ता यादीची पडताळणी करणे आवश्यक आहे. परंतू अंगणवाडी रिक्त पद भरतीचे अर्ज भरून २ महिन्यांचाचा कालावधी पूर्ण झाली तरीसुध्दा अजूनपर्यंत गुणवत्ता यादी जाहीर झाली नाही, त्यामुळे अंगणवाडीच्या पद भरतीला अर्थपूर्ण विलंब होत असल्याची तक्रार जिल्हा प्रशासन व शासनाकडे करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीवर शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार पद भरतीसाठी शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हा वार्षिक योजनेंबाबत**

**(२७) १२७४६ (०८-०४-२०१५). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सुमारे १४५ करोड २० लाख रुपयाचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक बैठकीमध्ये मंजुर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत मंजुर झालेल्या विकास कामांबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी मार्फत शासनाने सादर करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनामार्फत विकास कामाकरिता निधी मंजुर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनामार्फत अंमलबलावणी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) वर्धा जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१५-१६ चा प्रारुप आराखडा तयार करण्याकरिता शासनाने तात्पुरत्या स्वरुपात रु.८२.६५ लक्ष नियतव्यय मर्यादा कळविली होती. जिल्ह्यातील कार्यान्वयन यंत्रणांकडून जिल्हा नियोजन समिती, वर्धा यांना रु.१४५.२० कोटी रकमेचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. तथापि, जिल्हा नियोजन समितीच्या दि.३०/०१/२०१५ रोजीच्या बैठकीत शासनाने कळविलेल्या रु.८२.६५ लक्ष नियतव्यय मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना, सन २०१५-१६ साठी रु.८२.६५ लक्ष रकमेचा प्रारुप आराखडा मंजूर करण्यात आला.

त्यानंतर मा.मंत्री (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या राज्यस्तरीय बैठकीअंती वर्धा जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१५-१६ करिता रु.१३०.६८ कोटी रकमेचा नियतव्यय मंजूर करण्यात आला. सदर नियतव्यय मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पीत निधी वर्धा जिल्ह्यास अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर शासन ज्ञापन, नियोजन विभाग, क्र.बीजीटी-१०१५/प्र.क्र.१०१/का.१४८१, दि.२१ एप्रिल, २०१५ अन्वये पूर्णपणे वितरीत करण्यात आला आहे.

---

**वर्धा जिल्ह्यात आदिवासी प्रकल्प कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२८) १२७४७ (१०-०४-२०१५). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील आदिवासी समाजाची लोकसंख्या लक्षात घेता नागपूर येथील आदिवासी विभागाचे प्रकल्प कार्यालय वर्धा जिल्ह्यात स्थलांतरीत करण्यासंदर्भातील मागणी लोकप्रतिनिधी जिल्ह्याचे पालकमंत्री यांचेकडे जानेवारी, २०१५ दरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने वर्धा जिल्ह्यात आदिवासी प्रकल्प कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबत शासन / प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही, तथापि स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दि.२७.०३.२०१५ च्या पत्रान्वये वर्धा येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नवीन कार्यालय सुरु करण्याबाबतची विनंती केलेली आहे.
(२) वर्धा येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नवीन कार्यालय सुरु करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेवाग्राम विकास आराखड्याबाबत**

**(२९) १२७५६ (०८-०४-२०१५). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेवाग्राम विकास आराखडा (गांधी फॉर टुमारो) या प्रकल्पांतर्गत वर्धा जिल्ह्यात शासनामार्फत सेवाग्राम विकास आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे डिसेंबर, २०१४ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विकास आराखड्याचा प्रस्ताव शासनास अवगत झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१५) :** (१) ते (४) सेवाग्राम विकास आराखडा, जि.वर्धा तयार करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यकक्षेत कार्यवाही करण्यात येत आहे. विकास आराखडा संबंधित विभागीय / जिल्हा स्थानिक यंत्रणांशी विचार विनियम करुन जी कामे त्या यंत्रणांमार्फत करता येतील त्यांचा समावेश आराखड्यात करुन सविस्तर प्रकल्प अहवालासह (डीपीआर) व तांत्रिक मान्यतेने सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना देण्यात आल्या आहेत. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात रु. १५.०० कोटी नियतव्यय ठेवण्यात आला आहे.

---

**आकोट (जि.अकोला) तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरना करणेबाबत**

**(३०) १२७८८ (०८-०४-२०१५). श्री. प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत ग्रामीण भागातील शेतक-यांना उचीत मार्गदर्शन केले जाते. तसेच शासनाच्या विविध योजनांबद्दल माहिती दिल्या जाते मात्र गत एक वर्षापासून येथील कार्यालयातील ६७ पैकी तब्बल ३४ पदे रिक्त असल्याने शेतकरी परिणामी आपल्या हक्कापासून वंचित राहात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी तालुका कृषी अधिकारी आकोट यांनी वरिष्ठ पातळी वरील अधिका-यांकडे अनेकदा पत्र व्यवहार करुनही अद्याप पर्यंत कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत चौकशी केली काय वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) पदे रिक्त आहेत हे अंशत: खरे आहे. तथापि रिक्त पदांचा कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपवून त्यांचेमार्फत शेती विषयक कामकाजाचे मार्गदर्शक शेतकऱ्यांना केले जाते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कृषि विभागातील गट-ब संवर्ग राज्यातील असून सदरची पदे राज्यस्तरावर एकत्रितरित्या भरली जातात. गट-क संवर्ग हा विभागस्तरावरील असून सदरची पदे विभागीय अथवा केंद्रीय पध्दतीने एकत्रितरित्या भरली जातात. केवळ गट-ड जिल्हास्तरीय आहे. ब संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही राज्यस्तरावर सुरु आहे. गट- क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे. उपरोक्त सर्व संवर्गाच्या भरती प्रक्रियेमध्ये आकोट तालुक्यातील रिक्त पदांचाही समावेश आहे.

---

**आकोट (जि.अकोला) येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी शेतक-यांना केळीच्या अनुदनाचा दुसरा टप्पा देण्यास हेतुपुरस्सर त्रास देत असल्याबाबत**

**(३१) १२७८९ (०४-०४-२०१५). श्री. प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी शेतक-यांना केळीच्या अनुदानाचा दुसरा टप्प देण्यास हेतुपुरस्सर त्रास देत आहेत, अशी तक्रार अकोली जहॉगीर गावातील प्रफुल ज्ञानेवर बदरखे व अन्यायग्रस्त शेतक-यांनी तहसिलदा आकोट यांना माहे ११ जानेवारी, २०१५ दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतक-यांवर होत असलेल्या अनुदान वाटप दिरंगाई बाबत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर प्रकरणी चौकशी केली असलयास काय आढळून आले,
(४) तद् नुसार दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) अनुदान वेळेत वाटप करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आकोट (जि.अकोला) आकोट शहराच्या मध्य भागातून जाणा-या राज्य महामार्गावर वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत असल्याने याकडे वाहतुक पोलिस विभागाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(३२) १२७९५ (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोट (जि.अकोला) शहराच्या मध्य भागातून जाणा-या राज्य महामार्गावर वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत असल्याने रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी राहत असल्याने या अरुंद रस्त्यावर अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे, यात येथील वाहतूक पोलिस विभागाच्या दुर्लक्षीतपणामुळे नागरिकांना बळी पडावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी येथील अनेक नागरिकांनी माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास वाहतूक पोलिस विभागाला अपघात व वाहतूक कोंडी होत असल्याबद्दल तक्रारी दिल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) :** (१) अकोट शहरातील रस्ते अरुंद असून शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या राज्य महामार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूस दुकाने आहेत. तसेच, दिवसेंदिवस मोटार वाहनांची आणि नागरीकांची संख्या वाढत असल्यामुळे या मार्गावर वाहतूकीची कोंडी होते हे खरे आहे. तथापि, वाहतूक पोलीसांनी दुर्लक्ष केल्यामुळे नागरीकांना बळी पडावे लागत आहे, हे खरे नाही.
(२) जानेवारी, २०१५ मध्ये पत्रकांरानी अपघात व वाहतुकीची कोंडी होत असल्याबद्दल वाहतूक विभागास निवेदन दिले आहे.
(३) या मार्गावर वाहतूकीची कोंडी होऊ नये याकरीता पार्किगसंबंधात सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. रहदारीस अडथळा निर्माण होऊ नये याकरीता वाहतूक पोलीसांची नियुक्ती करण्यात आली असून, शहरामध्ये ३ बी.एम. मोबाईल आणि २ जीप पेट्रोलिंगकरीता नेमण्यात आल्या आहेत. रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी राहू नये याकरीता मोटार वाहन कायद्यांतर्गत सातत्याने कारवाई करण्यात येते. या मार्गावर असणार एस.टी. महामंडळ, अकोट विभाग

यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सन २०१४ मध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५,३१० वाहनचालकांवर कारवाई करुन रु. ८,७८,३५०/- आणि मार्च २०१५ अखरेपर्यंत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २,०४९ वाहनचालकांवर कारवाई करुन रु. २,८८,१००/- एवढे तडजोड शुल्क वसुल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भूम- वाशी (ता.जि.उस्मानाबाद) येथे विंड वर्ल्ड इंडिया लिमिटेड या कंपनीने शेतक-यांकडून अल्पदरात जमिन संपादित करुन सुध्दा वीज निर्मिती करण्यात न आल्याबाबत**

**(३३) १२८०२ (०४-०४-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम- वाशी (ता.जि.उस्मानाबाद) येथे विंड वल्ड इंडिया लिमिटेड या कंपनीने शेतक-यांकडून अल्पदरात जमिन संपादित केली अहे मात्र तेथे अद्‌याप वीज निर्मिती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शेतक-यांच्या अनेक तक्रारी मा.संचालक, मेढा, जि.पुणे यांचेकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पुढे शासनाने वीज निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०६-२०१५) :**(१) ते (५) पवनऊर्जा प्रकल्पासाठी लगणा-या जमिनी ह्या विकासक/प्रकल्पधारक यांच्यामार्फत परस्पर शेतक-यांकडून घेतल्या जातात. विंड वर्ल्ड इंडिया लि. या कंपनीने उस्मानाबाद जिल्हयातील भूम-वाश तालुकयातील गावांमध्ये जमीनी चालू बाजारभाव रेडी रेकनर दराप्रमाणे शेतक-यांनी मान्या केलेल्या दरात विकत घेतल्या आहेत.

शेतक-यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, सन्माननीय विधानसभा सदस्य यांच्याकडून महाऊर्जा, पुणे यांच्याकडे पत्रव्यवहार झाला आहे.

---

**राज्यातील पाटबंधारे महामंडळाकडील वाहनांवर मागील दहा महिन्यात पेट्रोल - डिझेलवर व अन्य बाबींवर झालेल्या खर्चाबाबत**

**(३४) १२८१० (०८-०४-२०१५). श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन कॉग्रेस - राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात जलसंपदा अंतर्गत मंजुरी दिलेल्या १२८ प्रकल्पांना शासनाने स्थगिती देऊन या काळात पाटबांधरे महामंडळाकडील गाड्यांवर मागील ६ महिन्यात पेट्रोल - डिझेलवर व अन्य कामांवर झालेल्या खर्चाचा सविस्तर अहवाल शासनाने मागविला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यात आतापर्यंत गाड्या कोणासाठी, कोणी व किती काळासाठी, किती कि.मी. धावून त्यावर पेट्रोल -डिझेलसाठी किती खर्च झाला आहे व गाड्या वापरणा-यांची नावे काय आहेत,
(३) अद्याप शासनास अहवाल प्राप्त झाला नसल्यास विलंबाची कारणे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कागल-हातकणंगले (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाने तळंदगे ग्रामपंचायतीचा सुमारे ४० लाखाचा कर थकविला असल्याबाबत**

**(३५) १२८३५ (०८-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कागल-हातकणंगले (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाने तळंदगे ग्रामपंचायतीचा सुमारे ४० लाखाचा कर थकविला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे ही ग्रामपंचायत आर्थिक संकटात सापडली असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा हा धोकादायक प्रकल्प कायमचा बंद करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधिताकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) चौकशीनुसार पुढे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) ग्रामपंचायत तळंदगे यांनी पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पासाठीची सन २००८-०९ ते सन २०१४-१५ अखेरची एकूण थकबाकी रक्कम रु.३९,३२,९७५/- इतकी असल्याचे दि.०९.१०.२०१४ च्या पत्रान्वये औद्योगिक वसाहतीस कळविले.

तथापि, सदर कर मान्य नसल्याचे कार्यकारी अभियंता म.औ.वि.म. विभाग कोलहापूर यांनी दि.१३.१०.२०१४ रोजीच्या पत्राने ग्रामपंचायतीस व दि.१४.१२.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेस कळविले.

त्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सीईटीपी प्रकल्पाची मोजमापे म.औ.वि.मं. यांचे अभियंता व ग्रामपंचायत कार्यकारिणी यांच्या उपस्थितीत संयुक्तपणे घेण्यात येवुन, कार्यकारी अभियंता म.औ.वि.म. यांच्या दि.२६.१२.२०१४ च्या पत्राने सीईटीपी प्रकल्पाच्या करापोटी प्रतिवर्षी रु.३.०० लाख प्रमाणे सन २००९-१० ते सन २०१४-१५ पर्यंतचे एकूण रु.१८.०० लाख देण्याचे मान्य केले.

ग्रामपंचायत तळंदगे यांचेकडे गावासाठी औद्योगिक वसाहतीकडून घेत असलेल्या पिण्याच्या पाण्सयासाठीची ऑगस्ट २०१२ ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीतील थकीत पाणीपट्टीची रक्कम रु.१६,२६,८७०/- इतकी होती. सदर रक्कम कपात करुन रक्कम रु.१,७३,१३०/- एवढ्या रकमेचा कर भरलेबाबतचा धनांदेश दि.२७.१२.२०१४ रासेजी ग्रामपंचायत तळंदगे यांचेकडे जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत तळंदगे यांची पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्रकल्पाकडे कराची रक्कम थकीत राहिलेली नाही.

ग्रामपंचायत तळंदगे यांनी दि.०५.०९.२०१४ च्या पत्रान्वये सीईटीपी प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणा-या दुष्परिणामाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, उप विभाग, इचलकरंजी यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३६) १२८६५ (०७-०४-२०१५). श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागाकडे ३६,५०० किराणा मालाची दुकाने, हॉटेल, पानपट्टीधारक यांच्यासह विविध दुकानांची नोंद असून औषध प्रशासनाकडे २,५०० पेक्षा अधिक नोंदणीकृत औषध यासह किरकोळ विक्रेत्यांच्या नोंदी असून त्यांचेवर लक्ष ठेवण्याकरिता केवळ सहाच अधिकारी असल्यामुळे सदर व्यवसायिकांवर नियंत्रण ठेवण्याकरिता नेहमी अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील दुकानांच्या नोंदी पाहता विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०५-२०१५) :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या कोल्हापूर कार्यालयात सह आयुक्त (औषधे)-१ पद, सह आयुक्त (अन्न)-२ पदे, औषध निरिक्षक-४ पदे व अन्न सुरक्षा अधिकारी-७ पदे अशी एकूण १४ पदे मंजूर असून, त्यापैकी औषध निरिक्षक संवर्गातील १ पद सदय:स्थितीत रिक्त आहे.

(२) रिक्त पद भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे तसेच प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वर्ग वाढवून प्रशासनाचे बळकटीकरण करण्याचा प्रस्ताव कार्यान्वित आहे.
(३) लागू नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात वर्षाभरात एकाही कन्येला सुकन्या योजनेचा लाभ मिळला नसल्याबाबत**

**(३७) १२८६७ (०८-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सुरू केलेल्या सुकन्या योजनेचा रत्नागिरी जिल्हयात बोजवारा उडाला असून गत अकरा महिने महिला व बालविकास कार्यालयात धुळखात पडलेले २३ प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी आयुक्त कार्यालयात पाठविण्यात आले असतांनाही वर्षभरात एकाही कन्येला या योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन स्तरावर जनजागृती कार्यक्रमांसाठी लाखो रूपये खर्च केले जात असतांनाही या योजनेपासून सुकन्या अनभिज्ञ राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार यासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जैतापूर आगरवाडी ते जैतापूर बंदर धक्का या मंजूर खारलँड बंधा-याचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) १२८६८ (०७-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जैतापूर आगरवाडी ते जैतापूर बंदर धक्का या मंजूर खारलँड बंधा-याचे बांधकाम गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित राहिल्यामुळे निवासी जागांसह शेती, बागायतीची मोठ्या प्रमाणावर धूप होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधा-याचे काम त्वरीत पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०५-२०१५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

पावसाळ्यात अतिवृष्टीवेळी व त्याचवेळी समुद्राला उधाण आल्यास काही अंशी पाणी शेतीत शिरते व त्यामुळे निवासी जागांसह बागायतीची थोड्या प्रमाणात धूप होते.

(२) होय.

(३) राजापूर तालुकयातील जैतापूर आगरवाडी ते जैतापूर बंदर धक्का यादरम्यान दळे जैतापूर खारभूमी योजना मंजुर असून सदर योजनेचे ८५ % काम पूर्ण झालेले आहे.

(४) आगरवाडी ते जैतापूर बंदर धक्का या भागात समुद्राचे भरतीचे पाणी नाल्यातून जात असल्याने काही क्षेत्र खाजण होऊन कांदळवनाची वाढ झालेली आहे. त्यामुळे उर्वरीत बंधा-याचे कामे करण्यास अडचणी येत आहेत.

---

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एकूण तीन टक्के निधी हा**
**अपंग पुनर्वसन व कल्याणार्थ खर्च करण्याबाबत**

**(३९) १२८७० (०७-०४-२०१५). श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एकूण तीन टक्के निधी हा अपंग पुनर्वसन व कल्याणार्थ खर्च करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायती अपंगाच्या कल्याणासाठी हा निधी खर्च करत नाहीत त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्ह दाखल करण्याच्या मागणीसाठी प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेच्या वतीने पोलिस अधिक्षक कोल्हापूर यांच्या कार्यालयाबाहेर दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी आंदोलन करुन वाहतूक ठप्प केली, हे ही खरे आहे काय,

(३) पोलिस अधिक्षक यांना अपंगाच्या संस्थेतर्फे दिलेल्या निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) आंदोलनकर्त्यांनी पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर आडवे झोपून रास्तारोको केला. त्यावेळी वाहतूकीची कोंडी होऊन वाहतूक ठप्प होऊ नये म्हणून सदर रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवून वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली होती.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि. ८.१.२०१५ रोजी जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी संबंधित अधिका-यांनी अंधकल्याणनिधी कोणत्या प्रकारे जमा व खर्च केला जातो याबाबतची माहिती दिली. त्यानंतर संबंधित संघटनेने कोणत्याही प्रकारचा आक्षेप नोंदविला नाही. जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांनी अद्यापि निधी न दिलेल्या ग्रामपंचायतींना आदेशित करण्यात येईल, असे सांगितले असून सदर बैठक शांततेत पार पडली.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यामध्ये सन २०१३-१४ च्या हंगामात अतिवृष्टीमुळे पडवे खारभूमी बंधा-याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याबाबत**

**(४०) १२८९४ (०८-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यामध्ये सन २०१३-१४ च्या हंगामात अतिवृष्टीमुळे पडवे खारभूमी बंधा-याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून यासंदर्भात दिनांक २९ मे, २०१४ रोजी मा.प्रकल्प संचालक व अधिक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे व दिनांक १६ डिसेबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी तात्काळ निधीची तरतुद करण्याबाबत विनंती करुन अद्यापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

रत्नागिरी जिल्यातमील राजापूर तालुक्यातील पडवे खारभूमी योजनेचे काम फेब्रुवारी, २०१३ मध्ये अंतिम करणेत आलेले होते. मे-२०१३ मध्ये पतन विभागामार्फत खारभूमी विभागाची पूर्व परवानगी न घेता पडवे खारभूमी योजनेच्या बांधावर जेटी चे बांधकाम करण्यात आले.

जुलै-२०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीकडील बाजूस पाण्याचा फुगवटा निर्माण झाला व जेटीच्या बांधकामामुळे पाण्याचा निचरा योग्य मार्गाने होऊ शकला नाही. त्यामुळे पुराचे पाणी बांधावरुन वाहून गेल्याने बांधाचे नुकसान झाले. सदर योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी देणेविषयी पतन अभियंता, पतन विभाग, मांडवी यांना विभागाचे, दि.१९/०४/२०१४ अन्वये कळविण्यात आले आहे.

(२) केवळ बंधा-यंचे नुकसान झालेले आहे. शेतक-यांचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे त्यांना नुकसंन भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ कामगार लढा कृती समितीमार्फत कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढून तीव्र निदर्शने केल्याबाबत**

**(४१) १२८९७ (१०-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ कामगार लढा कृती समितीमार्फत दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढून तीव्र निदर्शने करीत शिष्टमंडळाद्वारे निवासी जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त समितीच्या मागण्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेतला वा कार्यवाही केली आहे,

(३) सदर निवेदनासंदर्भात अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर मागण्यांची महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या सल्ल्याने तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) पशुवैद्यकीय दवाखानाच्या डॉक्टरांची तसेच अन्य पदे भरण्याबाबत आणि बंद असलेले पशुवैद्यकीय दवाखाने पुर्ववत सुरु करण्याबाबत**

**(४२) १२९२४ (३०-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्यात (जि.कोल्हापूर) गेल्या पाच दशकात गायींच्या संख्येत २१७.९३ टक्के, म्हशीच्या संख्येत १७८.४५ टक्के शेळीच्या संख्येत २४.७ टक्के वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या पाच दशकात पशुधनात १५२ टक्क्यांनी वाढ झाली असली तरीही तालुक्यात शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याची दूर अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील जांभळी, यड्राव, हेरवड, दत्तवाड, दानोळी, अब्दुललाट येथील पशुवैद्यकीय दवाखाना बंद असून तालुक्यतील इतर ठिकाणी डॉक्टरांची तसेच शिपांयाची पदे रिक्त असल्याने त्यांचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखानाच्या डॉक्टरांची तसेच अन्य पदे भरण्याबाबत आणि बंद असलेले पशुवैद्यकीय दवाखाने पुर्ववत सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुधन विकास अधिकारी या पदांसाठी ३०० उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आली असून त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे. अन्य रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्त व संबंधित जिल्हा परिषदांमार्फत करण्यात येत आहे.

---

## सोलापूर विद्यापीठात शाहिर अमर शेख यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबतची केलेली मागणी

**(४३) १२९३३ (०९-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर विद्यापीठात शाहीर अमर शेख यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोद्यांकडे निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरील मागणीबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) होय.
(२) महाराष्ट्रातील विविध अकृषि विद्यापीठाकडून अध्यासन निर्माण करण्याबाबत वाढती मागणी विचारात घेवून अध्ययासनासंदर्भात निश्चित धोरण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. यासंदर्भात धोरणात्मक निर्णय झाल्यावर अध्यासन निर्मितीचा विचार करणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऑनलाईन शॉपिंगचा व्यवसायाबाबत

**(४४) १२९४४ (०८-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाखोंची उलाढाल होत असलेल्या ऑनलाईन शॉपिंगचा व्यवसाय फ्लिपकार्ट, ॲमेझॉन, स्नॅपडिल, किंडल इ. कंपन्यांचा दिवसेंदिवस फोफावत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजारभावापेक्षा स्वस्त वस्तू विकणा-या कंपन्यांकडून शासनास कर अदा करण्यात येतो वा कसे याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, परराज्यातून विक्रीसाठी येणा-या वस्तूवरील कर वसुलीबाबत शासन कोणती उपाययोजना वा कार्यवाही करणार आहे वा केली आहे,
(५) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१५) :** (१) होय.
(२) याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील कंपन्यांकडून कर अदा करण्यात येतो.
(३) वरीलप्रमाणे.
(४) सदरहू ऑनलाईन व्यवहान महाराष्ट्रातील एखाद्या व्यक्तीने वस्तू ऑनलाईन खरेदी केली असेल व ती वस्तू दुस-या राज्यातील व्यापा-याने महाराष्ट्रातील व्यक्तीस परस्पर विक्री केली असेल तर विक्री करणा-या व्यापा-यास ज्या राज्यातून विक्री केली त्या राज्यात केंद्रीय विक्रीकर कायदा, १९५६ अंतर्गत केंद्रीय विक्रीकर आकारला जातो.

महाराष्ट्रातील व्यापा-याने वस्तुची महाराष्ट्रात ऑनलाईन विक्री केली असल्यास महाराष्ट्र मूल्य वर्धित कर कायदा, २००२ अन्वये विक्री करणा-या व्यापा-यावर कराची आकारणी होते. ऑनलाईन शॉपींगचा व्यवसाय करणा-या व्यापा-यांपैकी काही कंपन्या विक्रीकर विभागाकडे नोंदीत आहेत तसेच विक्रीकर विभागाकडे कर भरणा करीत आहेत.
(५) लागू नाही.

---

## पशु व मत्स्यविज्ञान विद्यापिठाच्या कुलगुरु यांच्या शैक्षणिक पात्रतेचे कोणतेही दस्तऐवज राज्यपालांकडे नसल्याबाबत

**(४५) १२९४६ (१७-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पशु व मत्स्यविज्ञान विद्यापिठाच्या कुलगुरुपदी नियुक्त झालेले डॉ.ए.के.मिश्रा यांच्या शैक्षणिक पात्रतेचे कोणतेही दस्तऐवज राज्यपालांकडे नसल्याची बाब बुलढाणा येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश भंडारे यांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या दरम्यान उघडकीस आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची सवस्तिर चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या निष्कर्षानूसार शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२२-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ च्या कलम १६ ची सुधारना सन २०१० चा अधिनियम १९, च्या कलम २ (क)(१) नुसार राज्यपाल महोदय कुलगुरु निवडीसाठी शोध समिती स्थापन करतात. समिती कुलपतीच्या विचारार्थ कमीतकमी पाच योग्य

व्यक्तींच्या नामिकेची त्यांच्या पात्र परिचयासह (Bio-data) कुलगुरु म्हणून नेमणून केली जाण्यासाठी शिफारस मा.राज्यपाल महोदयांच्या विचारार्थ सादर करतात. अशाप्रकारे मा.राज्यपाल महोदयांच्या कार्यालयांकडे शोध समितीकडून फक्त योग्य व्यक्तिंची नामिका त्यांच्या पात्र परिचयासह (Bio-data) प्राप्त होते.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी प्रकल्प क्षेत्रातील (कोर) तीन गावातील ४६७ कुटुंब आजही या प्रकल्प क्षेत्रातच वास्तव्याला असल्याबाबत**

**(४६) १२९५१ (०८-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी प्रकल्प क्षेत्रातील (कोर) तीन गावातील तब्बल ४६७ कुटुंब आजही या प्रकल्प क्षेत्रातच वास्तव्याला असून १४ वर्षापासून त्याचे पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात आजघडीस ४५ वाघ तितकेच बिबट व शेकडो इतर हिस्त्र प्राण्यांचा वावर असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब क्रं.१ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामस्थांचे लवकरात लवकर पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील (कोर) क्षेत्रामध्ये ६ गावांचा समावेश आहे. सन २००२-०३ मध्ये प्रथम टप्यात कोळसा २०६,बोटेझारी १०७ व प ळसगांव (सिं.) १५० कुटूंबे मिळून ४६३ कुटूंबाचे पुनर्वसन राखीव कक्ष ५२४ भगवानपूर येथे करण्याचे ठरले असता पळसगांव (सिं.) या गावातील ग्रामस्थांनी ऐन वेळोवर कोळसा व बोटेझारी या गावासोबत राखीव कक्ष ५२४ भगवानपूर येथे पुनर्वसनास नकार दिल्यामुळे त्यांचे पुनर्वसन होऊ शकले नाही.

सन २००६-०७ या दरम्यान बोटेझारी गाव सर्व कुटूंबासह व कोळसा येथील ४९ कुटुंबाचे पुनर्वसन भगवानपूर येथे करण्यात आले.

सन २०१२ व त्यानंतर आजतागायत कोळसा येथून ४२ कुटूंबाचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. पुनर्वसनासाठी उर्वरीत कुटूंबांचे मन वळवण्याची प्रक्रिया चालू होती. आता त्यांन पुनर्वसनाची तयारी दाखवली आहे.

तसेच सन २०१३ मध्ये रामदेगी (नवेगांव) व २०१४ मध्ये जामणी या गावाचे त्यातील सर्व कुटुंबासह चिमूर तालुक्यातील खडसंगीजवळील राखीव कक्ष २९ व ४२ मध्ये स्वेच्छेने

पुनर्वसन करण्यात आले आहे.

तसेच पळसगांव (सिं.) या गावाने वरोरा तालुकयातील राखीव कक्ष ११ मध्ये जाण्याची तयारी दर्शविल्यामुळे वन (संवर्धन) १९८० कायद्यांतर्गत त्या जमिनीचे वळतीकरण करण्यायी कार्यवाही सुरु आहे.

रानतळोधी या गावाने भद्रावती तालुकयात पुनर्वसन करण्यास ठराव नुकताच सादर केलेला आहे. जागा निश्चित होणे बाकी आहे.

व्याघ्र प्रकल्पात आजघडीस ४५ वाघ तितकेच बिबट व शेकडो इतर हिस्त्र प्राण्यांचा वावर असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत हे खरे नाही. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोर व बफर क्षेत्रात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ पर्यंत २१ व्यक्ती जखमी व ८ व्यक्ती मृत झालेल्या आहेत.

---

**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एका मजूर कुटुंबास संपूर्ण वर्षात फक्त १०० दिवसात काम मिळण्याच्या तरतूदी बाबत**

**(४७) १२९५४ (०८-०४-२०१५). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री. मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एका मजूर कुटुंबास संपूर्ण वर्षात फक्त १०० दिवसात काम मिळण्याची तरतूद असल्यामुळे ४ ते ५ सदस्य असलेल्या कुटुंबास वर्षभरामध्ये फक्त २० ते २५ दिवसच काम उलब्धत होते व १० ते ११ महिने त्यांना काम उपलब्ध नसल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुर कुटुंबातील प्रत्येक सदस्यास वर्षभरातून किमन ६ महिने काम उपलब्ध होईल या करिता शासनाकडून काय उपायोजना करण्यात येईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्टीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केंद शासन १०० दिवस प्रती कुटुंब रोज्रगाराची हमी देते तर राज्य शासनकडून महाराष्ट रोजगार हमी अधि नियम १९७७ (दि ६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित) मधील कलम ३ (२) नुसार १०० दिवसांवरील म्हणजेच संपूर्ण वर्षभर प्रती कुटूंब रोजगाराची हमी देण्यात आली आहे या तरतूदीनुसार राज्य शासना प्रती कुटूंब १०० दिवसांवरील मजुरांच्या मजुरीचा खर्चाच आर्थिक भार उचलते

(२) प्रश्न उद्भवत नाही

---

**हिंगोली जिल्हयाचा सिंचन अनुशेषाबाबत**

**(४८) १२९६० (०८-०४-२०१५). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळ परभणी जिल्हयाचे विभाजन होऊन हिंगोली जिल्हा स्वतंत्ररित्या अस्तित्वात आल्यामुळे एकत्रित परभणी जिल्हयाच्या सिंचन अनुशेषामधून हिंगोली जिल्हयाचा सिंचन अनुशेष वेगळा केल्यास हिंगोली हा जिल्हा सिंचन अनुशेषातंर्गत येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही हिंगोली जिल्हयाचा अनुशेष स्वतंत्ररित्या वेगळा काढून दुर करण्याबाबत उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष स्वतंत्रणे वेगळा करुन तातडीने दुर करण्याबाबत शासनाकडून काय उपाययोजना करण्यात येतील ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) होय.

(२) निर्देशांक व अनुशेष समितीने १९९४ च्या पातळीवरील तत्कालीन ३० जिल्हयाचा पाटबंधारे विकास क्षेत्रातील अनुशेष परिगणित केला होता. अविभाजित परभणी जिल्हयात अनुशेष नव्हात. सद्यःस्थितीत निर्देशांक व अनुशेष समितीने परिगणित केलेल्या अनुशेष निर्मुलनाची कार्यवाही सुरु असून त्याबाबतचे संनियंत्रण केले जाते. विभाजीत हिंगाली जिल्हयाचा अनुशेष स्वतंत्रारित्या परिगणित करुन त्यांचे संनियंत्रण सध्या केले जात नाही हे खरे आहे. मात्र विभाजीत हिंगोली जिल्हयातील सिंचन सुविधा वाढविणेसाठी काही योजना मंजूर केल्या आहेत.

(३) विभाजीत हिंगोली जिल्हयातील सिंचन सुविधा वाढविणेचे दृष्टीने आखलेल्या योजना पुर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न केले जातील.

---

**हिंगोली जिल्हातील मानव विकास कार्यक्रमातंर्गत सुरु करण्यात आलेल्या अभ्यासिकेबाबत**

**(४९) १२९६२ (०८-०४-२०१५). श्री. तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हातील हिंगोली, सेनगांव व औढा (ना.) तालुक्यात मानव विकास कार्यक्रमातंर्गत सुरु करण्यात आलेल्या अभ्यासिका विविध कारणामुळे बंद आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासिका बंद असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदर अभ्यासीका सुरू करण्याबाबत शासनाकडून तातडीने काय कार्यवाही करण्यात येईल ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०५-२०१५) :** (१) व (२)

सन २०१४-१५ या वर्षात हिंगोली जिल्हयामधील हिंगोली तालुक्यातील ५ अभ्यासिका गावापासून दूर असणे, अभ्यासिकेची अयोग्य वेळ, स्त्री शिक्षिकेची नेमणूक नसणे, मुलींची उपस्थिती नसणे या कारणांमुळे बंद होत्या. तसेच गौढा (ना.) या ठिकाणची एक शाळा नवीन

इमारतीत स्थलांतर झाल्यामुळे या ठिकाणी मुलींना पालक पाठवित नसल्यामुळे एक अभ्यासिका बंद होती.
(३) वरील पार्श्वभूमिवर शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून कार्यवाही करण्यात आली असून हिंगोली तालुक्यातील ३ अभ्यासिका सुरु करण्यात आल्या असून उर्वरित दोन अभ्यासिका सुरु करण्यात येत आहेत.

---

**रामनगर पोलीस ठाण्यांतर्गत (जि.गोंदिया) कन्हारटोली शहरात**
**दोन युवकांनी दहा तोळे सोने घेऊन पलायन केल्याबाबत**

**(५०) १२९८५ (०७-०४-२०१५). श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामनगर पोलीस ठाण्यांतर्गत (जि.गोंदिया) कन्हारटोली शहरातील व्यापारी आनंदकुमार जैन यांच्या घरात दागिने चमकवून देतो असे सांगून दोन युवकांनी दहा तोळे सोने घेऊन पलायन केले असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रामनगर येथे गु.र.क्र.९४/२०१४, भा.दं.वि, कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयाच्या अनुषंगाने दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पोलीस तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.